


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

वर्ष ५ । अंक १६३ । शनिवार १४ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## चहा पाजण्याच्या बहाण्याने लुटणारा आरोपी जेरबंद

### तीन लाखांची रक्कम फिर्यादीला परत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** चहा पाजण्याच्या बहाण्याने वृद्ध व्यक्तीची तीन लाख रुपये रोकड लुटणाऱ्या आरोपीला कोतवाली पोलिसांनी अटक करून लुटलेली रक्कम हस्तगत केली आहे. जप्त केलेली तीन लाख रुपयांची रक्कम पोलिसांनी मूळ फिर्यादीकडे सुपूर्द केली आहे.

बजीराव काशीनाथ पोकळे (वय ६५, रा. कौठे यामाई, ता. शिरूर, जि. पुणे) हे मुलीच्या उपचारासाठी अहिल्यानगर येथे आले होते. त्यावेळी ओळखीचा लाला उर्फ लालासाहेब सुद्रिक याने त्यांना चहा पाजण्याचा बहाणा करून दुचाकीवर बसवून निर्जन ठिकाणी नेले आणि त्यांच्या बॅगेतील तीन लाख रुपयांची रोकड हिसकावून फरार झाला होता. या घटनेची तक्रार कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार संतोष बनकर, राहुल शिंदे, पोलीस अंमलदार सुरज कदम, दीपक रोहकले, सत्यजित शिंदे, शिरीष तरटे यांच्या पथकाने तपास करत आरोपीचा शोध घेत त्याला जेरबंद केले. आरोपीकडून लुटलेली तीन लाख रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली असून ती रक्कम पोलिसांनी फिर्यादीकडे परत दिली आहे.

या कारवाईमुळे पोलिसांच्या कामगिरीचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

## स्थानिक गुन्हे शाखे कडून मुकुंदनगरमध्ये अवैध गोमास विक्रीचा पर्दाफाश

### कत्तलखाना उघडकीस करून लाखोंचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरातील मुकुंदनगर परिसरात सुरू असलेल्या अवैध कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकत तीन आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून सुमारे ३,३३,४३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईत तब्बल ३०० किलो गोमास कत्तलीसाठी वापरण्यात येणारी हत्यारे आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली. ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये मुस्तफा कुरेशी मुदस्सर कुरेशी आणि शकील कुरेशी यांचा समावेश आहे तर कत्तलखान्याचा चालक सोफियान कुरेशी आणि जागा मालक वसीम तवेरा हे फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी यांच्या पथकाने केली असून पुढील तपास भिंगार कॅम्प पोलीस ठाणे करत आहेत.

## पोलिस भरतीतील पात्र उमेदवारांची उद्या न्यू आर्टसमध्ये लेखी परीक्षा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नुकत्याच घेण्यात आलेल्या मैदानी पोलिस भरतीतील पात्र उमेदवारांची उद्या (दि.१५ ) न्यू आर्टस महाविद्यालयात दुपारी ४ ते ५.३० या वेळेत लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात दिले आहे.

जिल्ह्यात ७३ रिक्त पदांकरीता लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा दि. १५ रोजी सकाळी ११. ते १२.३० या वेळेत घेण्यात येणार होत्या परंतु त्यामध्ये बदल करुन प्रशासकीय अंशतः बदल करण्यात आला असून ही परिक्षा आता दुपा ४ ते ५.३० या वेळेत घेण्यात येणार असून त्यापुर्वी परीक्षांर्थीनी दुपारी २ वाजताच परिक्षा केंद्राबाहेर उपस्थित राहणे आवश्यक आहे. दुपारी ३.३० नंतर परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## पैठणमध्ये दुसऱ्या मजल्यावरून पडून युवकाचा मृत्यू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरातील शहागड रोड परिसरात असलेल्या पॅराडाईज इंग्लिश स्कूलच्या इमारतीवरून पडून एका ३५ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उपेंद्र राजेंद्र घरवाडवे (वय ३५, रा. इंदिरानगर, छत्रपती संभाजीनगर) असे मृत युवकाचे नाव आहे. ते पॅराडाईज इंग्लिश स्कूल, शहागड रोड येथील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून पडल्याची माहिती समोर आली आहे. त्यांना तातडीने उपचारासाठी सरकारी दवाखाना, पैठण येथे दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिसांना दिल्यानंतर एडी क्रमांक १७/२०२६ कलम १९४ अंतर्गत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोहेका गायकवाड करीत असून अधिक माहिती तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

## महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून शासन जनतेच्या दारी – सभापती प्रा. राम शिंदे

### कर्जत तालुक्यातील भांबोरा येथे शिबिर संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** सामान्य नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडवून शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी शासनाने राबविलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरातून प्रशासन जनतेच्या दारी नेण्याचा हा प्रभावी उपक्रम असल्याचे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. कर्जत तालुक्यातील भांबोरा येथील सिद्धेश्वर मंदिर परिसरात आयोजित समाधान शिबिरात ते बोलत होते.
यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, तहसीलदार रवी सतवन, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ, गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी, सरपंच लताताई जगताप, उपसरपंच दीपक लोंढे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी, स्थानिक पदाधिकारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

प्रा. शिंदे म्हणाले , शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना अनेकदा लहान-मोठ्या कामांसाठी शासकीय कार्यालयांत अनेक फेरे मारावे लागतात. ही गैरसोय दूर करण्यासाठी हे समाधान शिबिर अत्यंत उपयुक्त आहे. संपूर्ण राज्यभर हा उपक्रम राबविण्यात येत असून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अधिक संवेदनशीलतेने काम करून नागरिकांच्या समस्या समजून घेत त्यांचे त्वरित निवारण करावे, असेही त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे महाराजस्व समाधान शिबिर राबविण्यात येत आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार, सामाजिक न्याय, महिला व बालकल्याण यासह सर्वच क्षेत्रांतील योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत या शिबिराच्या माध्यमातून पोहोचविण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.
प्रा.शिंदे पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराच्या माध्यमातून केवळ विविध शासकीय योजनांची माहिती देणे किंवा लाभ वितरित करणे एवढ्यापुरते मर्यादित काम नसून, सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडी-अडचणींचे जागेवरच निराकरण करण्याचा हा प्रभावी उपक्रम आहे.

शासन आणि प्रशासन थेट जनतेच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या ऐकून तत्काळ मार्ग काढण्याचा प्रयत्न या शिबिरातून केला जात आहे. नागरिकांना कार्यालयीन दिरंगाई, वारंवार फेऱ्या मारण्याची गरज किंवा माहितीअभावी होणारा त्रास कमी होऊन अनेक कामे एकाच ठिकाणी मार्गी लागणार आहेत. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी या समाधान शिबिरात सहभागी होऊन शासकीय योजनांचा लाभ घ्यावा तसेच आपल्या प्रलंबित अडचणी मांडाव्यात, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले , शासनाच्या सर्व योजनांचा लाभ थेट पात्र लाभार्थ्यांपर्यंत त्यांच्या गावातच पोहोचावा या उद्देशाने हे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर जिल्ह्यातील सर्व मंडळ स्तरावर व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. प्रशासन नागरिकांच्या दारी जाऊन सेवा देण्याच्या भूमिकेतून हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. सर्वसामान्यांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेली विविध शासकीय प्रमाणपत्रे, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका तसेच ॲग्रीस्टॅक नोंदणी यांसारखी महत्त्वाची कागदपत्रे एकाच ठिकाणी

### अहिल्यानगर येथील निर्मल नगर येथील गंगा लॉन येथे विराट हिंदू संमेलन

## हिंदू धर्मातील पवित्र गाय व माय संरक्षण करणे युवकांचे आद्य कर्तव्य - शांतीब्रह्म महंत आदिनाथ महाराज शास्त्रीजी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदू धर्मातील पवित्र गाईचे तसेच देवीस्वरूप असणाऱ्या मातृशक्तीचे म्हणजे स्त्रीचे संरक्षण करणे हे प्रत्येक युवकाचे आद्य कर्तव्य आहे, असे प्रतिपादन तारकेश्वर गडाचे महंत ह.भ.प. गुरुवर्य शांतीब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्रीजी यांनी केले. अहिल्यानगर येथील निर्मल नगर येथील गंगा लॉन येथे दि. १३ मार्च २०२६ रोजी आयोजित विराट हिंदू संमेलन कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण (प्रवचनात) करताना ते बोलत होते.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रांत कार्यकारणी सदस्य हेमंतजी हरहरे, युवान प्रतिष्ठानचे संदीपजी कुसळकर, तसेच हिंदू संमेलनाचे अध्यक्ष कैलास शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की, हिंदू धर्म हा आद्य आणि सनातन धर्म असून त्याचे पालन आणि रक्षण करणे प्रत्येक हिंदूचे आद्य कर्तव्य आहे. हिंदू संस्कृतीत गाईला अत्यंत पवित्र स्थान आहे. गावरान गाय टिकली तर तिच्या आरोग्यदायी दुधामुळे भावी पिढी सुदृढ, सत्वशील आणि संस्कारवान घडण्यास मदत होईल.




(छाया : उदय जोशी)

तसेच स्त्री ही देवीस्वरूप शक्ती असल्याने तिचे संरक्षण आणि संवर्धन करणे समाजाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. स्त्रीशक्तीचा सन्मान आणि संरक्षण केल्यास भावी पिढी चारित्र्यवान घडेल आणि भारताचे सार्वभौमत्व टिकविण्यास सक्षम ठरेल, असेही त्यांनी सांगितले. पुढे बोलताना महाराजांनी सांगितले की, हिंदू धर्माचा मूलस्वभाव मायाळूपणा आणि दयाभाव दाखवणारा आहे. त्यामुळे हिंदूंनी जागृत राहून आपल्या संस्कृतीशी एकनिष्ठ राहणे आवश्यक आहे. असे झाले तरच सनातन हिंदू धर्म अधिक दृढपणे टिकून राहील. या विराट हिंदू संमेलनास अहिल्यानगरकरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभल्याने कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नवनाथ पालवे, गोकुळ काळे, विजय आव्हाड, सचिन बडे, पप्पू गीते, राजू बडे, कैलास गरजे, सचिन पानसरे, सार्थक मेरगू, संदीप औटी, अनिल पालवे, सुजय पानसरे, किरण आव्हाड, अक्षय कराळे, शुभम वाघ, राधेश्याम कुलकर्णी, अनिल रामदासी आणि नंदकुमार चिंतामणी यांनी विशेष प्रयत्न केले.

## दै. आकर्षण निवडक

### गुलमोहर रोडवरील स्वामी समर्थ मंदिरात १७ मार्च पासून धार्मिक कार्यक्रम

**अहिल्यानगर- सावेडी उपनगरात**



**गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन व श्री स्वामी समर्थ मंदिराचा २०वा वर्धापन दिन सोहळा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.श्री स्वामी समर्थ सेवा संस्था यांचे वतीने शुक्रवार दि.२० मार्च २०२६ रोजी प्रकट दिनानिमित्त खालील कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.गुरुवार दि.१९ मार्च २०२६ रोजी गुढीपाडवा निमित्तपहाटे ५ वा. श्रींच्या मूर्तीला अभ्यंगस्नान,सकाळी ८ वा.आरती दुपारी १२ वा.नैवद्यआरती,सायं ७ वा.धूपआरती,सायं.७.३० वा.सौ. उज्वला जोशी यांचा भक्ती संगिताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.शुक्रवार दि.२० मार्च २०२६ रोजी पहाटे ५ वा.श्रींना रुद्राभिषेक,सकाळी ८ वाआरती, दुपारी १२.३० वाजता नैवद्य आरती, नंतर दुपारी १ते ३ महाप्रसाद (भंडारा)होईल. सायं.६ वाजता गुलमोहर रोड, पारिजात चौक, श्रीराम चौक परिसरातून श्री.स्वामी समर्थ महाराजांच्या उत्सव मुर्तीची व पादुकांची मिरवणूक काढण्यात येणार आहे.या सोहळ्यात सर्वांनी सहभागी व्हावे. मिरवणुकीनंतर रात्री ९ वाजता आरती, रात्री १० वाजता शेजारती होईल.असे कार्यक्रम यावेळी पार पडतील.या प्रकट दिना निमित्त गुरुलीलामृत पारायण सोहळा दिनांक १७,१८,१९ मार्च रोजी दररोज दुपारी १२.३० वाजता होणार आहे. तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मंदिराच्या वतीने करण्यात आले.**

### हिंदू धर्मरक्षक स्व. अनिल राठोड यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमानी साजरा

**अहिल्यानगर- हिंदू धर्म रक्षक स्व. अनिल राठोड यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त थंडाईचे वाटप शशिकला राठोड, दिव्या राठोड आणि रचना राठोड यांच्या हस्ते उपस्थितांना वाटप करण्यात आले. सचिन शिंदे, मुन्ना भिंगारदिवे, रमेश खेडकर, किरण बोरुडे, महेश शेळके, दिलदार सिंग बीर, सचिन पवार, नरेश भालेराव, अक्षय नागापुरे, अंबादास शिंदे, श्रीकांत चेमटे, अभिजित अष्टेकर, अरुण झेंडे, प्रदीप निलाखे, शलमान मेढे, तन्मय मडके, सचिन गोंधळे, दत्तात्रय गोसके, महेश राऊत, सचिन धेंड, दत्तात्रय नागापुरे, सुमित धेंड , राहुल भट आदी मान्यवर उपस्थित होते. शशिकला राठोड म्हणाल्या की, स्व. अनिल राठोड यांनी आयुष्यभर हिंदू धर्म व समाजासाठी कार्य केले. त्यांच्या कार्यातून आम्हाला प्रेरणा मिळते. समाजात एकता, सेवा आणि संस्कार यांचे महत्त्व त्यांनी नेहमीच अधोरेखित केले. त्यांच्या जयंतीनिमित्त अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.त्यांचप्रमाणे रक्तदान ,नेत्र तपासणी , रक्त तपासणी शिबिर असे विविध शिबिर संपन्न झाले. शहरप्रमुख संभाजी कदम, दत्तात्रय कावरे,बाळासाहेब बोराटे, गिरीश जाधव,संजय झिंजे,मंदार मुळे, संजय शेंडगे,शाम नळकांडे, अनिल लोखंडे, रणजित परदेशी, गिरीधर हांडे,दिपक भोसले, संतोष गेनप्पा,परेश लोखंडे, दत्ता जाधव, यासह अनिल भैय्या वर प्रेम करणारे अनेक जण उपस्थित होते.**

## मधुमेह व उच्च रक्तदाब चिकित्सा तपासणी व उपचार शिबारात १०८ रुग्णांची तपासणी

# आनंदऋषीजी हॉस्पीटल हे रुग्णांकरीता एक वरदान - अभय गुगळे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** सातत्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल गरीब - गरजू रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात, त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत आहे. ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्या माध्यमातून हॉस्पिटलच्यावतीने होत आहे. गुगळे परिवाराचा हॉस्पिटलच्या स्थापनेपासून सहभाग आहे आरोग्याच्या या कार्यात गुगळे परिवार सहभागी असल्याचा मनस्वी आनंद होत आहे. या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा, यासाठी हॉस्पिटलने आता यापुढेही अशीच सेवा सुरु ठेवावी, असे प्रतिपादन एस.बी.जी. ट्रेडर्सचे अभयकुमार गुगळे यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ड सर्जरी सेंटर मध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मरणानिमित्ताने स्व. कमलाबाई सुवालालजी गुगळे व स्व. सुवालालजी बन्सीलाल जी गुगळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एस.बी. जी. ट्रेडर्स , अभयकुमार अजित कुमार गुगळे परिवाराच्या वतीने आयोजित मधुमेह व उच्च रक्तदाब चिकित्सा तपासणी व उपचार शिबिराचे उद्घाटन एस.बी.जी. ट्रेडर्स चे अभय कुमार अजित कुमार गुगळे यांच्या हस्ते करण्यात आले. अजितकुमार गुगळे,सौ. साधना गुगळे,सौ.कल्पना



गुगळे,सौ. श्रुती गांधी,सौ. सारीका गुगळे,सौ. श्रध्दा गुगळे,सौ. लक्ष्मी गुगळे,सोहन गुगळे, हर्षल गुगळे, रोनक गुगळे व गुगळे परिवार , नेत्र तज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा डॉ वसंत कटारिया ,डॉ. गजेंद्र गिरी, डॉ.प्राजक्ता पारधे, डॉ. स्वप्नील शिंदे आदी तज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

गुगळे पुढे म्हणाले की, कोरोना काळातही रुग्णांना चांगली सेवा दिल्याने आनंदऋषीजी हॉस्पिटलचे काम प्रेरणादायी आहे. सामाजिक भान ठेवून आनंदऋषीजी हॉस्पिटलच रुग्णांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांचा आर्थिक भार हलका करत आहेत. सरकारी योजना प्रभावीपणे आनंदऋषीजी हॉस्पिटलने राबवून रुग्णांना दिलासा देण्याचे काम करत असल्याचे सांगितले. श्रुती गांधी म्हणाल्या रूग्णसेवा हा एक यज्ञ असून तो सातत्याने चालविणे अवघड काम आहे हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचे काम जैन सोशल फेडरेशनचे सर्व पदाधिकारी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने करत आहे हे गौरवास्पद बाब आहे. समाजातील प्रत्येक घटकाला योग्य ती सेवा दिली जात आहे जे कार्य केले जाते पूर्ण श्रध्देने व निष्ठेने केले जात आहे. या कार्यात गुगळे परिवाराची तिसरी पिढी सहभागी होत असल्याने सुख-समाधान-शांती लाभत असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात प्रकाश कांकरिया म्हणाले की, हे सामाजिक कार्य अजून जोमाने करण्याचा मानस आहे. साामजिक बांधिलकीच्या माध्यमातून अत्याधुनिक मशिनरी व तज्ञ डॉक्टरांमार्फत कमी दरात रुग्णांना सेवा देण्याचा सातत्याने गेली २५ वर्षे प्रयत्न हॉस्पिटलच्यावतीने सुरु असल्याचे सांगितले. गुगळे परिवार सारखे दानशूर व्यक्तीमुळेच हे शक्य झाले आहे आरोग्याच्या या यज्ञात गुगळे परिवार पुढची पिढी सहभागी झाली आहे मधुमेह उच्च रक्तदाब हे साधारणता वयाच्या चाळीशी नंतर सुरू होतात त्यामुळे वेळेत उपचार गरजेचे आहे पुढे होणारे धोके त्यामुळे ठेवू शकतात त्याकरता या शिबिराच्या माध्यमातून आम्ही खारीचा वाटा उचलत आहोत. डॉ वसंत कटारिया ,डॉ. गजेंद्र गिरी, डॉ.प्राजक्ता पारधे, डॉ. स्वप्नील शिंदे आदी तज्ञ डॉक्टर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी आभार माणकचंद कटारिया यांनी मानले. या शिबीरात १०८ रूग्णांची तपासणी करण्यात आली.

---

## स्व.यशवंतराव चव्हाण यांचे कार्य आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी - प्रा. अमोल खाडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रा. अमोल खाडे यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महान नेत्याच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या या दूरदर्शी नेत्याच्या कार्याची आठवण यावेळी काढण्यात आली. समाजकारण, राजकारण आणि प्रशासन या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी घालून दिलेला आदर्श आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना प्रा. अमोल खाडे म्हणाले की, महाराष्ट्राच्या विकासाचा भक्कम पाया घालण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी केले. ग्रामीण भागाचा विकास, शिक्षणाचा प्रसार आणि सहकार चळवळीला बळ देण्यामध्ये त्यांचे योगदान अतुलनीय आहे. दूरदृष्टी, संयम आणि सर्वसमावेशक विचार या गुणांच्या जोरावर त्यांनी महाराष्ट्राला प्रगतिपथावर नेण्याचे कार्य केले.

ते पुढे म्हणाले की, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजहिताची जाणीव ठेवली पाहिजे. ज्ञान, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी यांच्या आधारे तरुणांनी प्रशासनात जाऊन समाजासाठी काम करण्याची प्रेरणा या महान नेत्याच्या जीवनातून मिळते.

या कार्यक्रमास अमोल जाधव, अर्पण पाचारणे, अविनाश खोमणे, निलेश गाढवे, प्रविण साळवे, सोहेल शेख, अभिजीत कटके, आकाश नागरगोजे, वैष्णव गिऱ्हे, देवेंद्र थोरात आदी उपस्थित होते.

## हरिभाऊ डोळसे यांचे कार्य कौतुकास्पद - राजेंद्र डांगे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** आडते बाजार,तेली समाज पंचाचा वाडा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी हरिभाऊ डोळसे तर व्हाईस चेअरमन पदी सौ.मीरा डोळसे यांची निवड झाल्याबद्दल सिद्धीबाग जलतरण तलाव मित्र परिवाराच्या वतीने डोळसे दांपत्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी राजेंद्र डांगे,ज्ञानेश्वर सुपेकर,अनिल गांधी,बाळासाहेब सोनवणे, सुरेशराव निसळ,राजेंद्र जोग, दत्तात्रय चव्हाण,किरण येवलेकर,रमेश चिपाडे,अशोक आहुजा,प्रमोद वाळके,पवन साळुंखे,जब्बार भाई शेख,सौ.वर्षा डोळसे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजेंद्र डांगे म्हणाले,हरिभाऊ डोळसे यांचे सामाजिक व धार्मिक कार्यात मोठे योगदान आहे. हरिभाऊ डोळसे यांनी श्री संताजी नागरी पतसंस्थेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचे काम केले आहे. श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी हरिभाऊ डोळसे व सौ. मिरा डोळसे यांची निवड झाली. ही सर्व मित्र परिवारासाठी आनंदाची बाब आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक महिला असते.याप्रमाणेच सौ. मीराताई डोळसे यांनी व्हाईस चेअरमन पदाची धुरा सांभाळलेली आहे. हरिभाऊ डोळसे यांचे कार्य कौतुकास्पद आहे.

सत्काराला उत्तर देताना चेअरमन हरीभाऊ डोळसे म्हणाले,डोळसे परिवाराला स्वर्गीय बाबुराव डोळसे यांचा सामाजिक कार्याचा वारसा लाभलेला आहे. श्री संताजी महाराजांच्या नावाने सुरू झालेली पतसंस्था ही समाजाच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी नेहमीच कार्यरत असते.समाजाची उन्नती व्हावी तसेच सर्वसामान्यांची पत बाजारामध्ये निर्माण व्हावी.छोटे व्यवसाय करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी श्री संताजी नागरी पतसंस्थेच्या वतीने सदैव सहकार्य करण्यासाठी प्रयत्नशील असतो.

---

## महिलांनी आज आप आपल्या क्षेत्रामध्ये कर्तव्य सिद्ध करून दाखवले - अमृता दारवेकर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** अहमदनगर शहर सहकारी बँक यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न झाला. नवीपेठ येथील कै. मुकुंद घैसास सभागृहात आयोजित या कार्यक्रमास बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते, ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा, संचालिका रेश्माताई आठरे, मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, सीनियर ऑफिसर प्रकाश वैरागर, संध्या मेढे, अमृता दारवेकर आदींसह महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या प्रसंगी बोलताना अमृता दारवेकर म्हणाल्या की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये आपली क्षमता सिद्ध करून दाखवली आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात महिला आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करत आहेत. अहमदनगर शहर सहकारी बँकेतील महिला कर्मचारी ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात. आपल्या कामातून प्रामाणिकपणा, शिस्त आणि समर्पण यांचे उत्तम उदाहरण त्यांनी घालून दिले आहे. यावेळी त्यांनी उपस्थितांना व्यक्तिमत्व विकासाबाबतही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. महिला कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्याचे स्वप्न साकार - विराज

### सासवडेची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी विधानभवनात भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर-** दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड जिद्द आणि गुणवत्ता दडलेली असते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा धोत्रे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीचा विद्यार्थी विराज सुभाष सासवडे याने दिला आहे. आपल्या सुंदर हस्ताक्षराच्या बळावर जिल्हा स्तरावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत त्याने उल्लेखनीय यश संपादन केले असून, या यशामुळे त्याचे एक मोठे स्वप्नही साकार झाले. विराजची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी विधानभवनात भेट घडून आली.

विराज सासवडे याने यापूर्वीही हस्ताक्षर स्पर्धेत जिल्हा स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले होते. त्यावेळी पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांनी विराजचे सुंदर हस्ताक्षर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापर्यंत पोहोचवले होते. विराजच्या हस्ताक्षराचे कौतुक करत अजित पवार यांनी विराज व त्याचे शिक्षक सचिन ठाणगे यांना भेटीसाठी आमंत्रण दिले होते. मात्र दुर्दैवाने ही भेट होण्यापूर्वीच अजित पवार यांचे निधन झाल्याने ती भेट अपूर्ण राहिली होती. दरम्यान, यावर्षी पुन्हा एकदा जिल्हा स्तरावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत विराजने आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्यानंतर आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी विधानभवनात विराजची भेट घडवून आणण्यात आली. यावेळी सुनेत्रा पवार यांनी विराजच्या सुंदर हस्ताक्षराचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या जोरावर मोठी स्वप्ने पूर्ण करू शकतात, याचे प्रेरणादायी उदाहरण विराज सासवडेने घालून दिल्याचे त्यांनी सांगितले. विराजच्या या यशामुळे धोत्रे खुर्द गावासह जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या भेटीप्रसंगी शिक्षक सचिन ठाणगे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब नाईकवाडी, पंढरीनाथ तागड, पालक सुभाष सासवडे, जयदीप ठाणगे, नाथा कोळेकर योगेश वाव्हळ , नामदेव कोळेकर आदी उपस्थित होते.

---

## नूतन उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा सत्कार; शहर विकासासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज

### विशाल गणपती मंदिर ट्रस्ट व सामाजिक कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** ॲड. धनंजय जाधव यांची अहिल्यानगर महानगरपालिकेच्या उपमहापौरपदी निवड झाल्यानंतर विविध स्तरातून त्यांचा सत्कार करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर श्री विशाल गणपती मंदिर ट्रस्टचे सचिव अशोक कानडे तसेच सामाजिक कार्यकर्त्या बेबीताई गायकवाड यांच्या वतीने ॲड. धनंजय जाधव यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या प्रसंगी बोलताना किशोर कानडे म्हणाले की, ॲड. धनंजय जाधव हे सुसंस्कृत, अभ्यासू आणि युवा नेतृत्व आहे. त्यांच्या नेतृत्वातून समाजाची व शहराची चांगल्या प्रकारे सेवा घडेल, अशी अपेक्षा आहे. शहरातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाची कामे मार्गी लावण्याची त्यांची क्षमता असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते निश्चितच सकारात्मक भूमिका बजावतील. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी



आणि नागरिक यांचे परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. या दृष्टीने ॲड. जाधव यांचे नेतृत्व शहरासाठी निश्चितच फायदेशीर ठरेल, असे त्यांनी सांगितले.

या वेळी ॲड. धनंजय जाधव यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, उपमहापौरपद ही मोठी जबाबदारी असून नागरिकांनी आणि सहकाऱ्यांनी दाखविलेल्या विश्वासाला पात्र राहण्यासाठी प्रामाणिकपणे काम केले जाईल. शहरातील मूलभूत प्रश्न सोडविणे, विकासकामांना गती देणे तसेच नागरिकांच्या अडचणी दूर करणे हे आपले प्राधान्य राहील. सर्वांना सोबत घेऊन अहिल्यानगरच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी भाजप गटनेत्या शारदाताई ढवण, नगरसेवक मोहित पंजाबी तसेच माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर आदी उपस्थित होते.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर - ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर- ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक - विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### भाजीमार्केटमध्ये कोयता बाळगणाऱ्या युवकावर गुन्हा

पैठण - शहरातील भाजीमार्केट परिसरात विनापरवाना धारदार शस्त्र बाळगणाऱ्या युवकाविरुद्ध पैठण पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अमोल सुभाष घोडके (वय २२, व्यवसाय मजुरी, रा. साठेनगर, पैठण) हा १३ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास पैठण येथील भाजीमार्केट परिसरात विनापरवाना धारदार कोयता बाळगून फिरताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून सुमारे ५०० रुपये किमतीचा ९ इंच धार असलेला व ७ इंच मुठ असलेला कोयता जप्त केला.या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल विलास कडुबाळ सुखधान (पो. ठाणे पैठण) यांच्या फिर्यादीवरून पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८३/२०२६, कलम ४ व २५ शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड करीत आहेत.

### शिरसगाववरखेड रस्ता तातडीने दुरुस्त करा



अहिल्यानगर - नेवासा तालुक्यातील शिरसगाव ते वरखेड हा मुख्य रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वार, पायी चालणारे भाविक आणि नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अपघाताची शक्यता कायम निर्माण होत असल्याने हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा, अन्यथा बुधवार दि. ०१ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ वाजता खडका फाटा (नेवासा) येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.याबाबत सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हाधिकारी व उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नेवासा यांना निवेदन देण्यात आले. संस्थापक अध्यक्ष नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, नेवासा तालुक्यातील वरखेड येथे दरवर्षी हनुमंत जयंतीपासून वरखेड देवीची यात्रा सुरू होते. यंदा सोमवार दि. ०६ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजता होम असून ०७ एप्रिल रोजी मुख्य यात्रा पार पडणार आहे. याच दिवशी सकाळी ११ वाजता पैठणची मानाची पालखी वरखेड गावात दाखल होते. ही पालखी वांबोरी येथील जुगा बाबा पोतराज येथून निघून पैठण येथे मुक्काम करून वरखेड येथे येते. वरखेड देवी ही महाराष्ट्रातील मातंग समाजाचे कुलदैवत मानली जाते आणि नवसाला पावणारी देवी म्हणून ती जगप्रसिद्ध आहे. यात्रेदरम्यान सर्व जातीधर्मातील भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येतात. या यात्रेत सुमारे ५ ते ६ लाख भाविक उपस्थित राहतात, त्यापैकी सुमारे ९० टक्के भाविक मातंग समाजातील असतात.मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, अहिल्यानगर, नाशिक, सुरत, धुळे, जळगाव, औरंगाबाद आदी विविध जिल्ह्यांतून भाविक रिक्षा, तीनचाकी, चारचाकी, टेम्पो, ट्रक तसेच एस.टी. बसमधून वरखेड येथे येतात. मात्र गावात भाविकांसाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने अनेक ग्रामस्थ व शेतकरी आपल्या जागेत तारकंपाउंड करून वाहन पार्किंगसाठी ५०० ते २००० रुपयांपर्यंत भाडे आकारत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे भाविकांची आर्थिक लूट होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने या प्रकाराकडे लक्ष देऊन भाविकांकडून आकारले जाणारे भाडे नियमानुसार निश्चित करावे तसेच यात्रेपूर्वी शिरसगाववरखेड रस्ता तातडीने दुरुस्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा बुधवार दि. ०१ एप्रिल २०२६ रोजी खडका फाटा, नेवासा येथे नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.यावेळी संस्थापक अध्यक्ष नामदेवराव चांदणे, वंचित बहुजन आघाडीचे अरुण जाधव, सुनील सकट, कडू बाबा लोंढे, संतोष शेलार, अशोक भोसले, लखन साळवे, हिराबाई गोरखे, दत्तू गोरखे, निलेश चांदणे, राजू आल्हाट, रामदास साळवे, लक्ष्मण साबळे, बंडू पाडळे, पोपट भोसले आदी उपस्थित होते.

# नेवासा तालुक्यातील तिघांवर पोलीसांची प्रतिबंधात्मक कारवाई

**दोघांची न्यायालयिन कोठडीत रवानगी तर एकाकडून ३० हजारांच्या दंडाची वसूली**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासाफाटा–** तीनपेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या दोघांसह बंधपत्राचे उल्लंघन करणाऱ्या एकावर अपर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या आदेशावरुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याने नेवासा तालुक्याच्या गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिते अंतर्गत यातील तीन व तीनपेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या दोघांची न्यायालयिन कोठडीत रवानगी करण्यात आली असून बंधपत्राचे उल्लंघन करणाऱ्या एकाचे बंधपत्र रद्द करुन त्याच्यावर ३० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशावरुन अहिल्यानगर पोलीस दलाच्या श्रीरामपूर विभागातील तीन व तीनपेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या आरोपींविरुद्ध कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, श्रीरामपूर यांच्याकडे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२९ खाली बंधपत्र घेणेकामी शेवगांवचे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांनी प्रस्ताव सादर केले होते. त्यापैकी हरिहर उर्फ बंटी भगीरथ औटी (वय–२३), रा.तामसवाडी, ता.नेवासा तसेच आकाश प्रविण तांबे (वय–२२), रा.पानेगांव, ता.नेवासा या सोनई पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील दोन गैरअर्जदारांना भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १३५(३) खाली जामीनदारांसह अंतरिम बंधपत्राबाबत आदेशित करुन तसेच वेळोवेळी मुदतवाढ देऊनही त्यांच्याकडून प्रतिसाद दिला जात नसल्याने या दोघांचीही दि.१० मार्च रोजी आठ दिवसांसाठी न्यायालयिन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

तर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १३६ खाली चांगल्या वर्तणुकीचे जामीनदारांसह दोन वर्षांकरीता अंतिम बंधपत्र करुन देणाऱ्या अक्षय रामदास चेमटे (वय–२५), रा.घोडेगांव, ता.नेवासा याने बंधपत्राच्या कालावधीत परत गुन्हेगारी कृत्य करुन बंधपत्राचे उल्लंघन केल्याबाबतचा अहवाल सोनई पोलीस ठाण्याकडून अपर पोलीस अधिक्षकांकडे सादर करण्यात आला. कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ४९१ व ४९२ अंतर्गत बंधपत्राचे उल्लंघन करणाऱ्या चेमटे याचे बंधपत्र रद्द करुन त्याच्यावर याप्रकरणी ३० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे. अपर पोलीस अधिक्षकांच्या या कारवाईने तालुक्यातील गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून यामुळे गुन्हेगारांच्या मुजोरीला चाप लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जाऊ लागली आहे.

# ग्रामीण भागातील कर्करोग रुग्णांना दिलासा द्या

**संसदेत लंके यांची ठाम मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** देशातील कर्करोग उपचार सुविधांतील तफावत दूर करून ग्रामीण भागातील रुग्णांना त्यांच्या जिल्ह्यात व तालुका स्तरावरच उपचार उपलब्ध व्हावेत, यासाठी खासदार नीलेश लंके यांनी शुक्रवारी लोकसभेत प्रश्न उपस्थित केला. राष्ट्रीय कर्करोग काळजी धोरणासंदर्भात तारांकित प्रश्न क्रमांक ३०१ अंतर्गत त्यांनी केंद्र सरकारकडे सविस्तर माहिती मागितली.

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी या प्रश्नाचे उत्तर सभागृहात दिले. देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये अद्याप व्यापक कर्करोग उपचार सुविधा उपलब्ध नसल्याची बाब लंके यांनी यावेळी अधोरेखित केली. केवळ सुमारे ३० टक्के जिल्ह्यांमध्येच कर्करोग उपचार केंद्रे उपलब्ध असल्यामुळे लाखो रुग्णांना उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे जावे लागते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. पूरक प्रश्न उपस्थित करताना लंके यांनी महाराष्ट्रातील भौगोलिकदृष्ट्या सर्वात मोठा जिल्हा असलेल्या अहिल्यानगरमधील परिस्थिती सभागृहासमोर मांडली. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना साध्या कीमोथेरपीसाठीसुद्धा मुंबई किंवा पुणे येथे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक तसेच मानसिक ताण वाढतो, असे त्यांनी सांगितले.

केंद्र सरकारने अर्थसंकल्प २०२५–२६ मध्ये प्रत्येक जिल्ह्यात 'डे–केअर कॅन्सर सेंटर' सुरू करण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयाला मुख्य उपचार केंद्र मानून सर्व तालुका रुग्णालयांना त्याची संलग्न उपकेंद्रे म्हणून विकसित करून तेथे डे–केअर कॅन्सर सेंटर सुरू करण्याची कालबद्ध योजना सरकारकडे आहे का, अशी विचारणा त्यांनी केली.

या पद्धतीने कर्करोगाचे निदान जिल्हा रुग्णालयात होऊन कीमोथेरपीसारखे उपचार रुग्णांना त्यांच्या तालुक्यातच मिळू शकतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच राष्ट्रीय निःशुल्क औषध उपक्रमांतर्गत कीमोथेरपीसाठी लागणारी महागडी औषधे व तज्ज्ञ डॉक्टर तालुका स्तरावर उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली.

याशिवाय कर्करोग उपचारांचा वाढता खर्च लक्षात घेता आयुष्मान भारत योजनेची सध्याची पाच लाख रुपयांची मर्यादा वाढवण्याचा किंवा 'आरोग्य मंत्री कर्करोग रुग्ण निधी'च्या माध्यमातून अतिरिक्त आर्थिक संरक्षण देण्याचा सरकारचा विचार आहे का, असा सवाल लंके यांनी केला.

**गॅस टंचाईकडे वेधले लक्ष**

**मध्यपूर्वेतील युध्दामुळे एलपीजी गॅसची आयात प्रभावित झाली असून त्यामुळे देशामध्ये निर्माण झालेल्या गॅसच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके व खासदार भास्कर भगरे यांनी संसदेच्या पाय-यांवर गॅसचे प्रतिकात्मक सिलेंडर घेउन धरणे आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.**

ग्रामीण भागातील रुग्णांना आर्थिक मदत मिळवण्यासाठीची प्रक्रिया सुलभ करून 'डिजिटल सिंगल विंडो' प्रणालीद्वारे ती राबवण्याचीही मागणी त्यांनी केली. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांवर उपचारासाठी शेती किंवा मालमत्ता विकण्याची वेळ येऊ नये, यासाठी कर्करोग उपचारांसाठी मजबूत आरोग्य आणि आर्थिक सुरक्षा यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे लंके यांनी यावेळी अधोरेखित केले.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ सांस्कृतिक सभागृह बांधण्यास मान्यता



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धनगर समाज संघर्ष समितीचे (महाराष्ट्र राज्य) संस्थापक अध्यक्ष मा.खासदार पद्मश्री. डॉ. विकास महात्मे , पांडुरंग धोंडिबा दातीर यांच्या विशेष प्रयत्नातून आणि माझे नेते ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीशभाऊ महाजन यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ सांस्कृतिक सभागृह बांधण्यास मान्यता दिली. त्यानुसार सन २०१८–१९ या आर्थिक वर्षात एकूण ६१ सभागृहांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. आता, याप्रकरणी अहिल्यानगर जिल्यातील एकूण ४ गावांच्या ठिकाणी (रु. १००.०० लक्ष च्या मर्यादेत ) त्या पैकी निमगाव घाना, नगर तालुका, मोहरी तालुका पाथर्डी अहिल्यानगर या ठिकाणी काम चालू आहे. आणि कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मा.श्री. युवराज कोकरे साहेब. उपाभियंता, राहुल कांबळे साहेब, धनगर संघर्ष समितीचे जिल्हा अद्यक्ष तथा आर्ट ऑफ लिविंगचे जिल्हा समन्वयक योग शिक्षक. पांडुरंग धोंडिबा दातीर. लेखाधिकारी ए वाय नरोटे साहेब समाज कार्यकर्ते गविनाथ भाऊ नरोटे ,पोपट भाऊ नरोटे ,उपसरपंच संजू भाऊ नरोटे ,सरपंच पोपटराव वाल्हेकर,पप्पू नरोटे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ बांधण्यात येणाऱ्या सांस्कृतिक सभागृहाची पाहणी करून संबंधित ठेकेदाराला लवकरात लवकर काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. मनःपूर्वक आभार.

## मुलांची वाढ नैसर्गिकरित्या होऊ द्या – प्रा विजय शिंदे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुलांवर कुठल्याही प्रकारचा दबाव न टाकता त्यांची नैसर्गिकरित्या वाढ होऊ द्या असे प्रतिपादन प्रा विजय शिंदे यांनी केले. सोलापूरवाडी येथील आदर्श शिशु मंदिर पूर्व प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले यावेळी शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी परिसरातील अनेक सरपंच मंडळी, संस्थेच्या संचालिका सौ. ज्योती घुले, युवराज घुले, स्वानंद थोरवे, नारायण थोरवे, ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना शिंदे पुढे म्हणाले कि विद्यार्थी घडत असताना त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवणं गरजेचे आहे. पालक




किंवा शिक्षक म्हणून आपली जबाबदारी आहे कि मुलं जशी आहेत तशीच त्यांची वाढ होऊ द्या. इतरांसोबत मुलांची तुलना करू नका. त्यामुळे त्यांची निकोप वाढ होणार नाही.

यावेळी संस्थेच्या प्रमुख ज्योती घुले यांनी प्रास्ताविक केले. त्यात संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्यांना शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा अच्यूत थोरवे यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

## अहिल्यानगरमध्ये वराह जप्तीच्या कारवाईने संताप – आमदार जगताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या कारवाई विरोधात आज महाराष्ट्र वराह पालन जन आक्रोश क्रांती मोर्चा काढत वराह पालक समाज मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरला होता. शहरात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलकांनी प्रशासनाविरोधात हल्लाबोल करत महापालिकेत मोर्चा काढण्यात आला यावेळी आमदार संग्राम जगताप आणि सागर बेग आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. दोन्ही नेत्यांनी प्रशासनाला थेट इशारा देत सांगितले गरिबांच्या पोटावर लाथ मारणारी ही कारवाई तात्काळ थांबवा अन्यथा अहिल्यानगरमध्ये तीव्र आंदोलन उभे करण्यात येईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी कैकाडी



वडार वाल्मिकी आणि वैदू समाजासाठी वराह पालन हा जगण्याचा आधार असल्याचा दावा करत आंदोलकांनी जप्त केलेले वराह तात्काळ परत द्या अशी जोरदार मागणी महानगरपालिका आयुक्तला केली. दरम्यान या आंदोलनामुळे अहिल्यानगरचे राजकीय वातावरण चांगले तापले असून पुढे काय घडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.या वेळी नगरसेवक भागानगरे.सामाजिक कार्यकर्ते भिमराज आव्हाड. तसेच वराह पालन करणारे नागरिक अदी मान्यवर उपस्थित होते.

# अध्यक्षांवर केलेला हल्ला हा राहुल गांधी यांना प्रभावी खासदार होण्यात आलेले अपयश लपवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न – अमित शहा

। संसदेत महत्त्वाच्या विषयांवर बोलण्याची वेळ येते तेव्हा राहुल परदेशात असतात । संसद ही काही जत्रा नाही;
। जो नियम पाळणार नाही त्याचा माईक बंद केला जाईल आणि त्याला सभागृहाबाहेरही जावे लागेल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लोकसभेत अध्यक्षांविरोधात आणलेल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा होण्याचा दिवस आला तेव्हा वातावरण आधीपासूनच तापलेले होते. पण जसेच राजकारणातील चाणक्य आणि प्रत्येक विषयावर पूर्ण तयारीनिशी उभे राहणारे रणनीतिकार अमित शहा बोलण्यासाठी उभे राहिले, तसे क्षणभर संपूर्ण सभागृह शांत झाल्यासारखे वाटले. कारण संसदीय राजकारणाचे बारकाईने निरीक्षण करणाऱ्यांना हे ठाऊक असते की, जेव्हा शाह बोलण्यासाठी उभे राहतात तेव्हा ती चर्चा केवळ एक साधी चर्चा न राहता; अनेकदा युक्तिवाद, वस्तुस्थिती आणि राजकीय संदेशांचा असा एक मिलाफ बनते, जो विरोधकांची रणनीती पूर्णपणे उधळून लावण्यास समर्थ असतो.त्या दिवशीही सभागृहात काहीसे असेच दृश्य पाहायला मिळाले.

त्या दिवशी सभागृहात चर्चेचा विषय लोकसभा अध्यक्षांविरुद्ध आणलेला अविश्वास प्रस्ताव होता, जो जवळपास चार दशकांनंतर समोर आला होता. भारताचे सर्वात मोठे लोकशाही व्यासपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सभागृहात अशा प्रकारची घटना घडणे साहजिकच असाधारण मानले जाते. ही चर्चा जवळजवळ १३ तास चालली, ज्यामध्ये ४० पेक्षा जास्त खासदारांनी आपली मते मांडली आणि शेवटी हा प्रस्ताव ध्वनी मताने फेटाळण्यात आला. पण चर्चा जसजशी पुढे सरकत गेली, तसतसे अनेक खासदार आणि राजकीय निरीक्षकांच्या मनात एकच प्रश्न फिरत राहिला हा खरोखर अध्यक्षांविरुद्ध अविश्वासाचा मुद्दा होता की मुख्य विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना एक प्रभावी संसद सदस्य म्हणून स्वतःला सिद्ध करण्यात आलेले अपयश झाकण्याचा हा एक प्रयत्न होता? संसदेत प्रभावी खासदार होण्यासाठी केवळ राजकीय




कौशल्येच नव्हे तर नियमांची समज, चर्चेत सातत्यपूर्ण सहभाग आणि सभागृहात वेळेवर उपस्थिती असणे आवश्यक आहे, याचे एक उत्तम उदाहरण म्हणून अमित शहा यांचे अनेकदा उल्लेख केले जाते.

जेव्हा सभागृहात महत्त्वाच्या मुद्द्यांवर बोलण्याची वेळ येते, तेव्हा बहुतेकदा मुख्य विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी देशाबाहेर असतात. कधी जर्मनीला, कधी व्हिएतनामला, कधी युनायटेड किंग्डमला, कधी सिंगापूर आणि मलेशियाला – अशा अनेक दौऱ्यांचा उल्लेख राजकीय चर्चांमध्ये अनेकदा केला जातो. आणि मग हेच नेते तक्रार करताना दिसतात की त्यांना बोलण्याची संधी दिली जात नाही. त्यामुळे सभागृहात उपस्थित असलेल्या लोकांच्या मनात एक स्वाभाविक प्रश्न निर्माण होतो– जर खासदार त्यावेळी उपस्थित नसतील तर ते सभागृहात कसे बोलतील? म्हणूनच, त्या दिवशीच्या चर्चेदरम्यान सभागृहातील काही सदस्यांनी अशी भूमिका मांडली की, अध्यक्षांवर करण्यात आलेला हल्ला हा कदाचित एक प्रभावी खासदार म्हणून कार्य करण्यास असमर्थ ठरल्यामुळे निर्माण झालेली राजकीय अस्वस्थता लपवण्याचाच एक प्रयत्न असू शकतो.

चर्चेदरम्यान आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला. संसदच्या कामकाजाचे नियम. संसदच्या परंपरा आणि नियमांची माहिती असलेल्यांना माहीत आहे की लोकसभा ही कोणत्याही राजकीय मेळाव्यासारखे चालत नाही. येथे प्रत्येक सदस्याला ठरलेल्या प्रक्रियेप्रमाणे आणि नियमांनुसारच बोलावे लागते. लोकसभेचे नियम ३७४, ३७५ आणि ३८० यांसारख्या तरतुदी स्पष्ट सांगतात की, सभागृहात गोंधळ झाला, शिस्तभंग झाला किंवा असंसदीय शब्दांचा वापर झाला तर स्पीकरला इशारा देण्याचा, सदस्याचे नाव घेऊन कारवाई करण्याचा, त्याला सभागृहातून बाहेर काढून टाकण्याचा किंवा निलंबित करण्याचा अधिकार असतो. त्यामुळेच संसदीय लोकशाहीत स्पीकरला फक्त अध्यक्षीय अधिकारी नव्हे, तर सभागृहाचा संरक्षक मानले जाते. त्या दिवशीही हा संदेश ठळकपणे समोर आला. सभागृह काही जत्रा नाही. येथे जो नियम पाळणार नाही, त्याचा माईक बंद होऊ शकतो आणि त्याला सभागृहाबाहेरही जावे लागू शकते. संपूर्ण देशाला माहीत आहे की संसदीय इतिहासात स्पीकरच्या पदाला नेहमीच पक्षीय राजकारणापेक्षा वरचे स्थान दिले गेले आहे. भारतीय संसदेची विश्वासार्हता आणि लोकशाही परंपरा याच संतुलनावर टिकून आहेत. म्हणूनच जेव्हा स्पीकरच्या निष्ठेवर प्रश्न उपस्थित होतात, तेव्हा त्याचा परिणाम फक्त संसदेपुरता मर्यादित राहत नाही; तर संपूर्ण जगात भारतीय लोकशाहीच्या प्रतिमेशीही तो जोडला जातो. संसदेतील अनुभवी सदस्यांच्या मते, जर सभागृहाच्या प्रमुखाच्या निष्पक्षतेवरच संशय निर्माण केला गेला, तर ते लोकशाही व्यवस्थेसाठी चांगले संकेत मानले जात नाहीत.

संसदेच्या कामकाजावर लक्ष ठेवणाऱ्या लोकांचे मत आहे की अलीकडच्या वर्षांत अनेक सकारात्मक बदलही झाले आहेत. भारतीय संसदेची उत्पादकता वाढणे, शून्यकालाचा वेळ वाढवणे, नव्या महिला खासदारांना बोलण्याची संधी देणे, प्रादेशिक भाषांच्या वापराला प्रोत्साहन देणे आणि डिजिटल संसदेसारखे उपक्रम या सर्व गोष्टींनी संसदेच्या कामकाजाच्या संस्कृतीला अधिक आधुनिक बनवण्यात योगदान दिले आहे.

डिजिटल रेकॉर्डिंग, ई–विधान ॲप्लिकेशन आणि पेपरलेस संसदेकडे टाकलेली पावलेही या बदलाचा भाग मानली जातात. या सुधारणांकडे अनेकदा त्या व्यापक राजकीय दृष्टिकोनाचा भाग म्हणून पाहिले जाते, ज्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने संस्थात्मक सुधारणांच्या रूपात पुढे नेले आहे. संसदेत झालेल्या या संपूर्ण चर्चेनंतर अनेकांना असे वाटले की ही फक्त एका प्रस्तावावरची चर्चा नव्हती, तर ती भारतीय राजकारणाचे प्रतिबिंब होते. एका बाजूला संसदीय नियम, संस्थांची प्रतिष्ठा आणि लोकशाही परंपरांचा मुद्दा होता, तर दुसऱ्या बाजूला राजकीय रणनीती आणि आरोप–प्रत्यारोपांचा भडिमार सुरू होता. पण त्या दिवशीची चर्चा पाहणाऱ्या अनेक खासदारांच्या मनात एक गोष्ट स्पष्ट होती: जेव्हा अमित शहा यांसारखे रणनीतीकार नेते सभागृहात पूर्ण तयारीने उभे राहतात, तेव्हा चर्चा फक्त उत्तर देण्यापुरती राहत नाही; ती एक राजकीय धडा बनते. आणि कदाचित म्हणूनच त्या दिवशी लोकसभेत शेवटी हाच संदेश घुमत राहिला की स्पीकरवर हल्ला करून लोकशाही मजबूत होत नाही; लोकशाहीची खरी ताकद नियम, परंपरा आणि जबाबदार राजकारण यात असते.

# राष्ट्रभाषा हिंदी परिक्षेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचा शंभर टक्के निकाल




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ‘महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे आयोजित’ हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेत अहिल्यानगर येथील प्रसिद्ध, ‘सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. दरवर्षी इयत्ता सहावी ते नववी या वर्गांसाठी वेगवेगळ्या स्तरावर ही परीक्षा आयोजित केली जाते. सप्टेंबर २०२५ ला ही परीक्षा विदयालयात घेण्यात आली होती. त्यात विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

परीक्षेचा निकाल: विशेष योग्यता प्राप्त – ३ विद्यार्थी,प्रथम श्रेणी– ५६ विद्यार्थी ,द्वितीय श्रेणी– ४६, तृतीय श्रेणी –३० विदयार्थी.

या परीक्षेस एकूण १४८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी १३४ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली,त्यात सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले . संस्थेचे पदाधिकारी , माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या गीता तांबे आणि प्राथमिक च्या मुख्याध्यापिका कंचन पापडेजा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव केला. विद्यार्थ्यांना अभिनंदन करताना गीता तांबे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना भवितव्यासाठी या परीक्षेचे महत्त्व समजावून सांगितले.

विदयालया मार्फत अशा अनेक स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या जातात.त्यासाठी प्राचार्या गीता तांबे मॅडम नेहमीच विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करत असतात. व वेळोवळी प्रोत्साहन देत असतात.

या यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या हिंदी विषय शिक्षिका सुमन कदम आणि सौ. वैशाली शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

# एमआयडीसीमध्ये औद्योगिक गॅस टंचाईचा प्रश्न गंभीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर एमआयडीसी औद्योगिक वसाहतीमध्ये निर्माण झालेल्या औद्योगिक गॅस टंचाईच्या गंभीर प्रश्नाबाबत असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅनुफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी पंकजा आशिया यांना निवेदन देण्यात आले. यावेळी उद्योजकांच्या विविध गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत चर्चा करण्यासाठी बैठकही आयोजित करण्यात आली.

मागील काही दिवसांपासून अहिल्यानगर औद्योगिक क्षेत्रातील अनेक उद्योगांना औद्योगिक गॅसच्या तीव्र टंचाईचा सामना करावा लागत आहे. उत्पादन प्रक्रियेसाठी अत्यावश्यक असणारा गॅस अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्याने अनेक



उद्योगांचे उत्पादन व्यवस्थापन विस्कळीत होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक उद्योगांमध्ये उत्पादन प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणून गॅसचा वापर केला जातो. मात्र सध्या नियमित व पुरेसा पुरवठा होत नसल्याने उत्पादन प्रक्रियेत वारंवार अडथळे निर्माण होत आहेत.

यामुळे उद्योगांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटत असून ठरलेल्या वेळेत ग्राहकांना माल पुरविणेही कठीण होत आहे. परिणामी उद्योगांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून, उद्योगांच्या विश्वासार्हतेवरही परिणाम होत असल्याची चिंता उद्योजकांनी व्यक्त केली आहे.

औद्योगिक क्षेत्रातील अनेक उद्योगांमध्ये हजारो कामगार कार्यरत आहेत. गॅस टंचाईची ही परिस्थिती दीर्घकाळ कायम राहिल्यास उत्पादन घटणे, कामगारांना काम बंद पडणे तसेच काही उद्योगांना तात्पुरते किंवा कायमस्वरूपी उत्पादन बंद करण्याची वेळ येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. याचा थेट परिणाम स्थानिक रोजगार, अर्थव्यवस्था आणि औद्योगिक विकासावर होऊ शकतो. अहिल्यानगर जिल्हा हा औद्योगिकदृष्ट्या प्रगतीपथावर असलेला जिल्हा असून राज्य सरकार उद्योगवृद्धीसाठी विविध धोरणे व सवलती देत आहे. मात्र अशा मूलभूत इंधन पुरवठ्यातील अडचणीमुळे उद्योगांच्या प्रगतीला गंभीर अडथळे निर्माण होत असल्याने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी सांगितले.

**आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये इंडो युरॉलॉजिकल व स्टोन शस्त्रक्रिया शिबिर**

# आनंदऋषी हॉस्पिटल गरजूंना हक्काचे उपचार देणारे केंद्र – भगवानदास गुगळे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य विविध मोफत रोग तपासणी शिबिरामध्ये आज इंडो युरॉलॉजिकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) तसेच स्टोन शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन उत्साहात पार पडले. आयोजक भगवानदास गुगळे (भातकुडगाव वाला), सौ. मंगला गुगळे, डॉ. पंकजजी गुगळे, महेशजी गुगळे, सोनल गुगळे, स्मिता गुगळे, अनुपमा भंडारी, रुखमनबाई बोरा, सिद्धार्थ गुगळे, रिया गुगळे, सार्थक गुगळे व समीक्षा गुगळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी डॉ. संकेत काळपांडे, डॉ. अमेय सांगळे, डॉ. स्वनीत देशपांडे, डॉ. अजित दरंदले, संतोष बोथरा ,सतीश लोढा ,डॉ.आशिष भंडारी ,मानकचंद कटारिया, वसंत चोपडा आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना आयोजक भगवानदास गुगळे यांनी सांगितले की, श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर हे सर्वसामान्य रुग्णांसाठी आधारवड ठरत आहे. ग्रामीण व गरजू नागरिकांना योग्य वेळी योग्य उपचार मिळावेत, यासाठी हॉस्पिटल सातत्याने विविध आरोग्य शिबिरे आयोजित करत असते. या माध्यमातून अनेक रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व उपचार मिळत असून त्यांच्या आरोग्याला मोठा दिलासा मिळत आहे. समाजसेवेच्या भावनेतून सुरू केलेले हे कार्य सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

सोनल गुगळे म्हणाले की, आनंदऋषी हॉस्पिटलच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांमध्ये हजारो रुग्णांना उपचाराचा लाभ मिळाला आहे. गरजूंना परवडणाऱ्या दरात तसेच अनेक वेळा मोफत सेवा देण्याचा प्रयत्न येथे केला जातो. त्यामुळे अनेक गरजू रुग्णांसाठी हे हॉस्पिटल हक्काचे ठिकाण बनले आहे. समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचा संकल्प हॉस्पिटलने केला असून ही सेवा भविष्यातही अखंडितपणे सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अजित दरंदले यांनी मूत्रपिंड, मूत्रमार्ग व मूत्राशयाशी संबंधित आजारांबाबत सविस्तर माहिती दिली. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे तसेच पाण्याचे अपुरे सेवन, अयोग्य आहार आणि उन्हामध्ये जास्त फिरणे यामुळे किडनी स्टोनसह अनेक मूत्रविकार वाढताना दिसत आहेत. अशा आजारांपासून बचाव करण्यासाठी दररोज पुरेसे पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात शरीरातील पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी अधिक प्रमाणात पाणी व द्रवपदार्थ घ्यावेत. तसेच लघवी रोखून ठेवू नये, संतुलित आहार घ्यावा आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करून घ्यावी. किडनी स्टोन किंवा मूत्रविकारांकडे दुर्लक्ष केल्यास पुढे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे लघवी करताना त्रास होणे, पाठदुखी, पोटदुखी किंवा लघवीमध्ये जळजळ होणे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. आधुनिक तंत्रज्ञानामुळे आज अनेक शस्त्रक्रिया अत्यंत सुरक्षित व सोप्या पद्धतीने करता येत असून योग्य वेळी उपचार घेतल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी डॉ.संकेत काळपांडे ,अमेय सांगळे यांची भाषणे झाली.

प्रास्ताविकात संतोष बोथरा यांनी सांगितले की, आनंदऋषी हॉस्पिटलच्या वतीने वेळोवेळी विविध आरोग्य शिबिरे आयोजित करून रुग्णांना उपचाराची संधी दिली जाते. या शिबिरांमध्ये मोठ्या प्रमाणावर रुग्ण उत्स्फूर्तपणे सहभागी होत असून त्यांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम उपचार मिळतात. हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या आधुनिक वैद्यकीय सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवेमुळे रुग्णांचा विश्वास दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळेच आनंदऋषी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये मोठ्या संख्येने रुग्ण सहभागी होत असल्याचे त्यांनी नमूद केले.गुगळे भातकुडगाव वाला परिवार यांचे आनंदऋषी हॉस्पिटल नेहमीच मोलाचे सहकार्य लाभते सामाजिक कामात हा परिवार अग्रेसर असतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले तर आभार सतीश लोढा यांनी मानले. या शिबिरामध्ये एकूण ६० रुग्णांनी तपासणी व उपचाराचा लाभ घेतला. रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन व तपासणी करून देण्यात आली.

# महाराजांच्या विचारांतून जनतेच्या प्रश्नांचे तत्काळ समाधान व्हावे – आ. काशिनाथ दाते सर

**‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ उद्घाटन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी व शासनाच्या विविध योजनांबाबतची कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी खडकवाडी ता. पारनेर येथे आयोजित ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ कार्यक्रमाचे उद्घाटन पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या शिबिरामध्ये नागरिकांच्या सोयीसाठी महसूल विभागासह कृषी, पंचायत समिती, ग्रामपंचायत, आरोग्य, पशुसंवर्धन, समाजकल्याण, महिला व बालविकास, महावितरण, अन्न व नागरी पुरवठा, परिवहन (एस.टी.), शिक्षण तसेच इतर विविध शासकीय विभागांची माहिती देणारे स्वतंत्र टेबल लावण्यात आले होते. उपस्थित नागरिकांनी आपल्या शंकांचे निरसन करून विविध कामे मार्गी लावून घ्यावीत, असे आवाहन आमदार दाते सरांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, नागरिकांच्या दृष्टीने महसूल विभाग अत्यंत महत्त्वाचा असून तहसीलदारांनी उपस्थित नागरिकांना शासनाच्या महसूल विषयक योजनांची सविस्तर माहिती देऊन त्यांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करावे. महसूल प्रशासनाचे बहुतांश काम ऑनलाईन झाले असले तरी सातबारा नोंद, फेरफार आदी बाबतीत अनेक तक्रारी येतात. अशा तक्रारींवर या अभियानाच्या माध्यमातून महसूल प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

राज्याचे माजी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महसूल प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी प्रभावी कामगिरी केली असून विद्यमान महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यात मोलाची भर घातल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या कार्यकाळात शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या अनेक योजना राबविण्यात आल्या असून नागरिकांनी या अभियानाच्या माध्यमातून त्या योजनांचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. कृषी विभागाविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांच्या कार्यकाळात विभागाच्या कामकाजाला मोठी गती मिळाली आहे. पारनेर तालुक्यात मागील दोन महिन्यांत तब्बल ७५० ट्रॅक्टरचे अनुदानावर वितरण करण्यात आले असून इतर कृषी अवजारांचेही मोठ्या प्रमाणावर वाटप झाले आहे. कृषी विभागाच्या कोणत्याही योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही, शेतकऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ. दाते यांनी केले.

यावेळी राज्य सरकारच्या शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाचा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीने दिलेला शब्द पूर्ण केल्याचेही आमदार दाते यांनी सांगितले. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान वाढवण्याची गरज असल्याची बाबही माझ्यासह अनेक आमदारांनी अधिवेशनात मांडल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. याशिवाय राज्य परिवहन महामंडळाच्या विविध लोकोपयोगी योजनांचा उल्लेख करत ज्यांना शक्य आहे त्यांनी एस.टी. प्रवासाचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. या शिबिरामुळे नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध झाली असून उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

**ग्लोबल वार्मिंगमुळे पावसाच्या अनियमिततेचा शेतीवर मोठा परिणाम होत असून पाण्याचे व पीक नियोजन करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. त्यामुळे शेतकरी व शेती अधिक समृद्ध व्हावी यासाठी कृषी विभागाच्या माध्यमातून पीक विमा योजना, सूक्ष्म सिंचन (ठिबक-तुषार) योजना, कृषी यंत्रीकरण, मृदा आरोग्य पत्रिका, फलोत्पादन विकास, शेतकरी सानुग्रह अनुदान अशा विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. आमदार काशिनाथ दाते सरांच्या माध्यमातून मागील वर्षात शेतकरी सानुग्रह अनुदान योजनेतून तालुक्यातील शेतकऱ्यांना पाऊणे दोन कोटी रुपयांहून अधिक मदत देण्यात आली आहे. तालुक्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घ्यावा, त्यासाठी विभागाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.**

**–गजानन घुले**
**(तालुका कृषी अधिकारी)**

# मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेकडून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, सभापती दिपाली बारस्कर व उपसभापती वर्षा सानप यांचा गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी सुभाष लोंढे, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी दिपाली बारस्कर तसेच उपसभापतीपदी वर्षा सानप यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे चेअरमन विजय कोतकर, व्हाईस चेअरमन किशोर कानडे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल तसेच संचालक शेखर देशपांडे, विकास गीते, सतीश ताठे, अजय कांबळे, बलराज गायकवाड, बाळासाहेब पवार, कैलास चावरे, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे,



बाळासाहेब गंगेकर, प्रमिलाताई पवार आणि कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते.

यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने आमचा सत्कार केल्याबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत. पतसंस्थेचे सभासद हे महापालिकेचे कर्मचारी असून त्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. कर्मचारी हेच नागरिकांच्या प्रश्नांपर्यंत पोहोचणारे महत्त्वाचे दुवा असून त्यांच्या माध्यमातूनच नगरकरांचे प्रश्न मार्गी लागत असतात. कर्मचाऱ्यांच्या अडचणीच्या काळात पतसंस्था आधार देत असते. त्यामुळे आपण सर्वजण एकत्रितपणे शहरातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी काम करू, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात चेअरमन विजय कोतकर म्हणाले की, महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे तसेच महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर आणि उपसभापती वर्षा सानप यांचा पतसंस्थेच्या वतीने सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नवीन जबाबदाऱ्या सांभाळताना ते शहर विकासासाठी चांगले काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# आरोग्य सेवेतील उल्लेखनीय कार्याला आमदार दातेंची दाद; डॉ. ऐश्वर्या होनमोरे–शिंदे यांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. ऐश्वर्या होनमोरे–शिंदे यांना आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात ‘वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न व महारोग्य सन्मान २०२६’ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या उत्कृष्ट, निष्ठावान व सेवाभावी कार्याची दखल घेत हा सन्मान राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री सौ. मेघना साकोरे–बोर्डीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या उल्लेखनीय यशाबद्दल पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार



काशिनाथ दाते सर यांनी खडकवाडी येथे आयोजित ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ कार्यक्रमात डॉ. होनमोरे–शिंदे यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी बोलताना आमदार दाते म्हणाले की, यापूर्वी या आरोग्य केंद्राबाबत नागरिकांकडून वैद्यकीय सेवेविषयी तक्रारी येत असत. मात्र डॉ. होनमोरे–शिंदे यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर परिस्थितीत सकारात्मक बदल झाला असून रुग्णसेवा अधिक प्रभावी व विश्वासार्ह झाली आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेऊन मिळालेला हा पुरस्कार संपूर्ण मतदारसंघासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जे दार आरोग्य सेवा देण्यासाठी अशा कर्तव्यदक्ष वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याचे नमूद करत आमदार दाते यांनी मतदारसंघातील इतर आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. त्यांच्या या यशाबद्दल परिसरातील नागरिकांनीही आनंद व्यक्त करत अभिनंदन केले.

**ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जे दार आरोग्य सेवा देणे हेच आपले कर्तव्य असून या कार्याची दखल घेत आमदार दाते सरांनी केलेला सन्मान हा अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. पुढील काळातही खडकवाडी परिसरातील नागरिकांना अधिक चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी मी कटिबद्ध राहिल.**

**डॉ. ऐश्वर्या होनमोरे–शिंदे**
**(वैद्यकीय अधिकारी, खडकवाडी)**

# पैठणमध्ये घरगुती गॅससाठी नागरिकांची मोठी गर्दी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरात घरगुती गॅस सिलेंडरच्या टंचाईचे चित्र निर्माण झाले असून सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. शहरातील संत एकनाथ गॅस सर्व्हिस कार्यालयासमोर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. गॅसचा तुटवडा जाणवत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घरगुती गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिक सकाळपासून एजन्सीसमोर रांगेत उभे राहत आहेत. काही नागरिकांनी असा आरोप केला आहे की, नियमित दरापेक्षा अधिक पैसे घेत सिलेंडर देण्यात येत आहेत. एका सिलेंडरसाठी सुमारे ३०० रुपये जादा आकारले जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. या प्रकाराबाबत अनेक नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या असल्याचे सांगितले जात आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, गॅसचा नियमित पुरवठा सुरळीत करावा तसेच जादा दर आकारण्याच्या तक्रारींची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

(पान १ वरून)

## महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून शासन जनतेच्या दारी – सभापती प्रा. राम शिंदे

उपलब्ध करून देण्याची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांची प्रलंबित कामे जलदगतीने पूर्ण होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात आणि हे समाधान शिबिर यशस्वी व्हावे, यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सक्रिय सहकार्य करावे. तसेच मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात तहसीलदार रवी सतवन यांनी समाधान शिबिर आयोजनाची भूमिका विशद केली.

शिबिरात महसूल, आरोग्य, पुरवठा, महिला व बालविकास, ग्रामविकास व पंचायतराज, शिक्षण, कृषी, वनविभाग, भूमी अभिलेख, आदी विभागांच्या माध्यमातून विविध सेवा देण्यात आल्या. उत्पन्न दाखले, शिधापत्रिका, शासकीय योजनांसाठी अर्ज, आरोग्य तपासणी, निवेदनांची नोंद, मार्गदर्शन आदी सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या. अनेक प्रकरणांचा जागीच निपटारा करण्यात आला, तर उर्वरित प्रकरणे तातडीच्या कार्यवाहीसाठी संबंधित विभागांकडे पाठविण्यात आली.